**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**सुचना क्र. ०१/२०१६**

**' पर्यावरण पुरस्कार - २०१६ '**

क्र.संगाबाअवि/१६/१७७/२०१६

दि. ०६/०८/२०१६

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे परिक्षेत्रातील सर्व प्रकारचे महाविद्यालय, शाळा व सामाजिक भावनेतून पर्यावरण संवर्धनाचे कार्य करणारे सक्षम प्राधिकारणांकडे नोंदणीकृत विविध प्रतिष्ठान आणि स्वयंसेवी संस्था (**गट - अ**) व व्यक्ती (**गट - ब**) यासंवर्गातून ज्यांनी वृक्षारोपन व वृक्षसंवर्धन, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन, जैवविविधता संवर्धन, अपारंपारिक उर्जा स्त्रोताचा वापर, जनजागृती व पर्यावरण संवर्धन इत्यादी क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केलेले असेल त्यांचेकडून ' **पर्यावरण पुरस्कार - २०१६** ' करिता नामांकन अर्ज मागविण्यात येत आहे. नामांकन अर्ज भरण्याची शेवटची तिथी **दि. ३१ ऑगष्ट २०१६** आहे. सदर पुरस्कारासंबंधीची माहिती व कार्यपध्दती आणि अर्जाचा नमुना (**गट - अ व गट - ब**) विद्यापीठाच्या उद्यान विभागात विना मुल्य मिळेल व **www.sgbau.ac.in** या संकेत स्थळावरून प्राप्त करता येईल.

**कुलसचिव**

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.**

प्रपत्र - अ

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## नियम क्र. ०३/२०१६

## " पर्यावरण पुरस्कार प्रदान करण्यासंबंधीचे नियम "

ज्याअर्थी, व्यवस्थापन परिषदेने पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या खालील नमुद गटातुन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे **' पर्यावरण पुरस्कार '** देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

त्याअर्थी उपरोक्त प्रयोजनार्थ नियम तयार करण्यात येत आहे.

१. हे नियम **' पर्यावरण पुरस्कार '** प्रदान करण्याबाबतचे **नियम ०३/२०१६** म्हणून संबोधण्यात येईल.

२. हे नियम व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिलेल्या तारखेपासून अमलांत येतील.

३. <u>प्रस्तावना</u>

वृक्षारोपन, वृक्षसंवर्धन, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन जैवविविधता संवर्धन, अपारंपारिक उर्जा स्त्रोताचा वापर व जनजागृती करणाऱ्या संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे परिक्षेत्रातील सर्व प्रकारचे महाविद्यालय, शाळा व सामाजिक भावनेतून पर्यावरण संवर्धनाचे कार्य करणारे सक्षम प्राधिकारणांकडे नोंदणीकृत विविध प्रतिष्ठान आणि स्वयंसेवी संस्था **(गट - अ)** व व्यक्ती **(गट - ब)** यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे प्रत्येकी एक **' पर्यावरण पुरस्कार '** देण्यात येईल. या दोन पुरस्काराला **गट - अ** व **गट - ब**, असे संबोधण्यात येईल. यासाठी दरवर्षी **दि. २ डिसेंबर ' राष्ट्रीय प्रदुषण नियंत्रण दिनी '** **गट - अ** व **गट - ब** यांच्यापैकी निवड झालेल्या प्रत्येकी एक **गट - अ** व **गट - ब** यांना विद्यापीठाचे स्मृतीचिन्ह, प्रशस्तीपत्र, रोख बक्षिस देवून गौरविण्यात येईल.

४. <u>उद्देश</u>

प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे **गट - अ** व **गट - ब** व्दारे पर्यावरणासंबंधी वृक्षारोपन, वृक्षसंवर्धन, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन, जैवविविधता संवर्धन, अपारंपारिक उर्जा स्त्रोताचा वापर व जनजागृती इत्यादींची आस्था निर्माण करण्यासाठी तथा या कार्यामध्ये स्पर्धा निर्माण व्हावी आणि चांगल्या कार्याला प्रोत्साहन मिळून त्यांचा गौरव व्हावा, या उद्देशाने **'पर्यावरण पुरस्कार'** सुरू करण्यात येत आहे.

५. <u>निम्नतम योग्यता</u>

प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे **गट - अ** व **गट - ब** व्दारे मागिल ५ वर्षा पासुन पर्यावरणासंबंधी वृक्षारोपन आणि वृक्षसंवर्धन, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन, जैवविविधता संवर्धन, अपारंपारिक उर्जा स्त्रोताचा वापर व जनजागृती या क्षेत्रात कार्य करित असतील त्यांना या पुरस्कारासाठी पात्र समजण्यात येईल.

६. <u>पुरस्कार योग्य संवर्ग</u>

प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे **गट - अ** व **गट - ब** या संवर्गातून प्रत्येकी एक यांचा या पुरस्कारासाठी विचार करण्यात येईल. या पुस्काराला **गट - अ** व **गट - ब** असे संबोधण्यात येईल.

७. <u>पुरस्काराचे स्वरूप</u>

पर्यावरण पुरस्कार करिता निवड झालेल्या **गट - अ** व **गट - ब** मधील प्रस्तावांना खालीलप्रमाणे पुरस्कार देण्यात येतील.

१) **गट अ** - रू. १५,०००/- रोख रक्कम, विद्यापीठाचे स्मृतीचिन्ह,प्रशस्तीपत्र.

२) **गट ब** - रू. १०,०००/- रोख रक्कम, विद्यापीठाचे स्मृतीचिन्ह, प्रशस्तीपत्र.

उपरोक्त पुरस्कार मा.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अथवा मा.कुलगुरूंच्या समकक्ष असलेल्या मान्यवर व्यक्ती किंवा पर्यावरण क्षेत्रातील तज्ञ मान्यवर व्यक्तिंच्या हस्ते समारंभपुर्वक प्रदान करण्यात येतील.

८. <u>**पुरस्कार निवड समिती :- पुरस्काराचे समितीमध्ये एकुण पाच सदस्य राहतील.**</u>

| | | |
|---|---|---|
| १) अध्यक्ष | - | अध्यक्ष ( व्य.प.ने नामित केलेले ) |
| २) सदस्य | - | १ सदस्य ( व्य.प.ने नामित केलेले ) |
| ३) विषयतज्ञ | - | १ सदस्य ( व्य.प.ने नामित केलेले ) |
| ४) मा.कुलसचिव | - | सदस्य |
| ५) उद्यान अधिक्षक | - | सदस्य सचिव |

व्यवस्थापन परिषद एक विषयतज्ञ नामित करतील, या समितीचे अध्यक्ष व एक सदस्य व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यामधुन नामित करेल. तसेच कुलसचिव व उद्यान अधिक्षक हे पद्सिध्द सदस्य व सदस्य सचिव म्हणून कार्यरत राहतील. विषयतज्ञ हे संबंधित शास्त्रातील पद्व्युत्तर असावे अथवा पर्यावरण संवर्धनाचे क्षेत्रात सातत्याने कार्यरत असणारे तज्ञ नामवंत व्यक्ति असावी. व्यवस्थापन परिषदेने नामित केलेले सदस्य, निवड समितीचे सदस्य राहतील.

९. **पुरस्काराची कार्यपध्दती**

- वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन जैवविविधता संवर्धन, अपारंपारिक उर्जा स्त्रोताचा वापर व जनजागृती या क्षेत्रात राष्ट्रीय किंवा आंतर राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार प्राप्त केलेली सर्व प्रकारचे महाविद्यालय, शाळा व सामाजिक भावनेतून पर्यावरण संवर्धनाचे कार्य करणारे सक्षम प्राधिकारणांकडे नोंदणीकृत विविध प्रतिष्ठान आणि स्वयंसेवी संस्था व व्यक्ती यांनी विद्यापीठाच्या ' **पर्यावरण पुरस्कारासाठी** ' अर्ज करणे अपेक्षित नाही.
- व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून पर्यावरणासंबंधीचे कार्य करणाऱ्यांना या पुरस्कार करिता अर्ज करता येणार नाही.
- नामांकन भरण्याची शेवटची **तिथी ३१ ऑगष्ट राहील.** यासबंधीची जाहीरात विद्यापीठाव्दारे वृत्तपत्रातून प्रकाशित करण्यात येईल व परिपत्रकाव्दारे कळविण्यात येईल.
- नामांकन अर्ज विहित नमुन्यात सादर करावयाचे असल्याने सदर नामांकन अर्जाच्या प्रती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे 'www.sgbau.ac.in' संकेतस्थळावरून प्राप्त करता येतील. यासंबंधीचे निकष अर्जासोबत जोडलेले आहे.
- ज्या वर्षासाठी नामांकन अर्ज मागविण्यात आलेले आहे. त्याचवर्षी **दि. २ डिसेंबर 'राष्ट्रीय प्रदुषण नियंत्रण दिनी'** पुरस्कार प्रदान करण्यात येईल. परंतु काही अपरिहार्य कारणास्तव वरिल तारखेत बदल करण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना राहील.
- निवड समिती, प्राप्त झालेल्या नामांकन अर्जाची छाननी करून, वैध नामांकन अर्ज असलेल्या सर्व प्रकारचे महाविद्यालय, शाळा व सामाजिक भावनेतून पर्यावरण संवर्धनाचे कार्य करणारे सक्षम प्राधिकारणांकडे नोंदणीकृत विविध प्रतिष्ठान आणि स्वयंसेवी संस्था **गट - अ** व व्यक्ति **गट - ब** या गटातून निवड समितीला प्रथमदर्शनी योग्य वाटलेल्या प्रत्येकी पहिल्या तीन कार्यक्षेत्राला प्रत्यक्ष भेटी देवून मुल्यमापन करतील.
- पर्यावरण पुरस्कार समिती आपल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करतील. निवड समितीच्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेला मान्य असल्यास **गट अ** व **गट ब** यामधुन प्रत्येकी एक यांना पुरस्कार प्रदान करण्यात येतील.
- पर्यावरण पुरस्कारासाठी निवड समितीच्या निष्कर्षानुसार **गट - अ** व **गट - ब** यामध्ये पात्र नसल्यास त्या वर्षीचा पुरस्कार देण्यात येणार नाही / घोषित करण्यात येणार नाही. याबाबतचे अंतीम अधिकार व्यवस्थापन परिषदेला राहतील.
- पुरस्काराचे नामांकन अर्ज **पांच प्रतीत** भरून पाठविणे अनिवार्य राहील.
- कलर फोटोच्या प्रती प्रस्तावासोबत सादर कराव्या व तसेच इतर सर्व दस्ताऐवजाच्या सत्यप्रती साक्षांकित असणे अनिवार्य राहील.
- पर्यावरण पुरस्काराच्या नावातील वर्ष दरवर्षी बदलविण्यात येईल.
- **गट – अ** मधुन नामांकन भरणारे महाविद्यालय, शाळा यांनी राष्ट्रीय सेवा योजना व हरित सेना योजनेकडून केलेल्याच कार्याचा केवळ उल्लेख असू नये. तर प्रत्यक्ष शाळा व महाविद्यालयव्दारे इतर विद्यार्थी, शिक्षक, पालकांच्या सहकार्याने केलेल्या कार्याचा उल्लेख प्रस्तावात असणे आवश्यक राहील. केवळ राष्ट्रीय सेवा योजना व हरित सेना योजनेच्या कार्यावरुन या पुरस्कारासाठी विचार केल्या जाणार नाही. हिच अट **गट - ब** गटासाठी देखील लागु राहील.
- सदर पुरस्कार प्राप्त करणाऱ्या **गट - अ** व **गट - ब** संवर्गातील कमीत कमी ०५ वर्ष पुन्हा अर्ज करता येणार नाही.
- पर्यावरण पुरस्काराबाबतचे नियम व अटी तसेच निर्णयाबाबत अंतिम अधिकार विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेकडे राहतील.
- पुरस्कार नामांकन अर्ज ' **कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती** ' यांचेकडे नोंदणीकृत डाकेव्दारे पाठवावे. विहित नमुन्यात व प्रतीत नामांकन अर्ज प्राप्त न झाल्यास अथवा विहित तिथीपर्यंत विद्यापीठाला प्राप्त न झाल्यास सदर प्रस्तावावर विचार केल्या जाणार नाही. **दि. ३१ ऑगष्ट** या नामांकनाच्या अंतीम तिथीला कोणत्याही प्रकारची सुटी असल्यास त्यानंतर पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवस अंतीम तिथी समजण्यात येईल.

१०. पर्यावरण पुरस्कारा करिता **गट - अ** व **गट - ब** या संवर्गाकरिता नामांकन अर्ज, निकष, प्रमाणपत्र, बॅनरचे व स्मृती चिन्हाचे स्वरुप, खर्चाचा आराखडा विहीत करण्यात आलेला आहे. ते **प्रपत्र अ,ब,क,ड,इ,ई,फ,ग,ह** वर जोडण्यात आलेले आहे.

११. पुरस्कार प्रदान केल्यानंतर या संबंधीची माहिती विद्यापीठाच्या राजपत्रात व वार्षिक अहवालामध्ये प्रसिध्द करण्यात येईल.

प्रपत्र - ब

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## " पर्यावरण पुरस्कार – २०१६ "

## निकष

1. गत पांच वर्षात केलेली वृक्षलागवड, वृक्ष लागवडीसाठी रोपे तयार करण्याची व्यवस्था. जसे - रोपवाटीका अथवा इतर उपक्रम.
2. लावण्यात आलेल्या वृक्षांची निवड करतांना वापरलेले निकष - स्थानिक अथवा दुर्मिळ जाती शोभिवंत किंवा उपयुक्त, सावली, चारा, फळे देण्याची क्षमता इत्यादि.
3. वृक्ष संवर्धन : जिवंत झाडांची संख्या, गुणवत्ता, झालेली वाढ, झाडांची यथायोग्य निगा राखण्याकरिता वापरलेले तंत्र.
4. जल संवर्धन : कार्यक्षेत्रात करण्यात आलेली जल व्यवस्थापनाची कामे, त्यामध्ये अर्जदाराच्या सहभागाचा पुरावा, उपलब्ध पाणी साठा, कामे करुन घेण्यासाठी राबविण्यात आलेली यंत्रणा इत्यादि.
5. जल व्यवस्थापनासाठी करण्यात आलेले उपाय, पाण्याचा दुरुपयोग टाळण्याचे प्रयत्न, सांडपाण्याचा पुनर्वापर इत्यादि.
6. पर्यावरण जनजागृतीसाठी अर्जदाराव्दारे राबविल्या गेलेले उपक्रम : जसे - नागरिकांसाठी व्याख्याने, विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा, वसुंधरा दिवस, वन्यजीव साप्ताह, जागतिक वन दिवस इत्यादि निमित्य विविध कार्यक्रमाचे आयोजन, निसर्ग / वन्यजीव छायाचित्र प्रदर्शन, निसर्गविषयक माहिती सांगणारे फलक, पोस्टर्स इत्यादि.
7. सहभागी घटकांनी पर्यावरण पूरक जीवनशैली स्वीकारावी म्हणून अर्जदाराने केलेले प्रयत्न उदा. सामायीक वाहन वापर, नो व्हेईकल डे, प्लास्टिक मुक्त परिसर व यासारखे अनेक उपाय.
8. अपारंपारिक उर्जास्त्रोतांचा वापर
9. परिसराचे पर्यावरण अधिक सुदृढ व्हावे म्हणून केलेल्या विविध उपाय योजना उदा. वनौषधींची जोपासना, कचरा निर्मूलनाच्या सुविधा, प्रदुषण निर्मुलनासाठी राबविण्यात आलेल्या उपाय योजना, पर्यावरण संवर्धनासाठी राबवलेले विशेष उपक्रम ई.
10. परिसरातील जैवविविधतेच्या जोपासनेसाठी जाणीवपूर्वक केलेले प्रयत्न
11. पर्यावरणासंबंधी विविध समस्यांच्या सोडवणुकीसाठी केलेले प्रयत्न.
12. पर्यावरण संवर्धन विषयक शासनाच्या विविध उपक्रमांमध्ये सहभाग.
13. पर्यावरण संवर्धनासाठी केलेल्या प्रयत्नाची विशेष दखल घ्यावी असे उपक्रम अथवा उपलब्धी.

प्रपत्र - क

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## ' पर्यावरण पुरस्कार - २०१६ '

### नामांकनासाठी अर्जाचा नमुना
### ( गट - अ )

**( अर्जदारास विहीत प्रपत्रातच अर्ज करावयाचा असून तो A-४ साईज पेपरवर संगणकीकृत करावा.)**

१) अर्जदाराचे नांव :----------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

२) अर्जदाराचा पुर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक :- ---------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

३) नोंदणी क्रमांक :- --------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

४) लागवड करण्यात आलेल्या झाडांची नांवे व संख्या.: (विस्तृत माहिती स्वतंत्र प्रपत्रात द्यावी.)

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

५) शासकीय / सामुहिक अथवा खाजगी जमिनीवर सरपन/वैरण देणा-या झाडांची लागवड :- ----

--------------------------------------------------------------------------------

| ज्या जमिनीवर लागवड केलेली आहे तिची मालकी- | क्षेत्रफळ (हे.) | जागेचे वर्णन (पडीक/खार जमिन/दलदल इ.) |
|---|---|---|
| खाजगी जमिन | | |
| सामुहिक जमिन | | |
| महसुल जमिन | | |

६) वृक्षलागवडीचे कार्यक्रमात ग्रामीण दुर्बल घटकांचा तसेच महिलांचा सहभाग घेतला असल्यास व त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये झालेली सुधारणा :- ------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

७) पर्यावरण संवर्धनासाठी विद्यार्थ्यांनी श्रमदानातून केलेले कार्य/सहभाग- ------------------

--------------------------------------------------------------------------------

८) सामुहिक लागवडीचे कुंपणाविना स्वयंस्फुर्तीने संरक्षण व देखभालीबद्दल केलेल्या कार्याची माहिती :-

--------------------------------------------------------------------------------

९) अपारंपारिक ऊर्जा स्त्रोताचा वापर करण्यासाठी जनतेला प्रोत्साहित करणे व त्याच्या वापरासाठी प्रवृत्त करण्यासाठी केलेल्या कार्याची माहिती सहपत्रासह :- ---------------------------

--------------------------------------------------------------------------------

...२...

१०) वृक्षलागवड, वृक्षसंवर्धन, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन, जैवविविधता संवर्धन, अपारंपारिक उर्जा स्त्रोताचा वापर या संबंधात केलेल्या प्रत्यक्ष कार्याची व जनजागृती / प्रसिध्दी व प्रेरणा याबाबत केलेल्या कार्याची तपशिलवार माहिती :- ------------------------------------------------

------------------------------------------------

११) केलेल्या कार्याचा कालावधी, लागवड केलेल्या जीवंत झाडांची टक्केवारी सद्यस्थिती :- ------

------------------------------------------------

------------------------------------------------

| तपशील | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१५ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| लागवडीचे क्षेत्र ( हेक्टरमध्ये ) | | | | | | |
| लागवड केलेल्या झाडांची संख्या | | | | | | |
| जीवंत झाडांची संख्या | | | | | | |
| जलव्यवस्थापन/जलसंवर्धन | | | | | | |

१२) केलेल्या कार्याविषयी काही ' व्याख्याने/प्रकाशने/प्रसिध्दी ' झाली असल्यास त्याच्या सत्यप्रती :-

------------------------------------------------

------------------------------------------------

१३) या अथवा अशा कामासाठी पुर्वी काही पारितोषिक, पुरस्कार, प्रशस्तीपत्रक इ. मिळाली असल्यास त्यांचा तपशील :- ------------------------------------------------

१४) इतर माहिती असल्यास :- ------------------------------------------------

**अर्जदाराची सही व हुद्दा**

## प्रतिज्ञापत्र

प्रतिज्ञापूर्वक सही करतो की, वर नमुद केलेल्या सर्व बाबी माझ्या ज्ञान व माहितीनुसार सत्य आहेत आणि माझ्या स्पष्ट जाणीवेनुसार दिलेल्या आहेत. प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या माहितीचे मुळ दस्ताऐवज तसेच प्रत्यक्ष कार्यक्षेत्राची पाहणी करण्यासंबंधी निवड समितीने मागणी केल्यास त्वरीत उपलब्ध करून देण्याची हमी देतो.

**ठिकाण :-**

**दिनांक :-**

**अर्जदाराची सही व हुद्दा**

------------------------------------------------

**(केवळ कार्यालयाकरिता)**

**१) प्रस्ताव अग्रेषित करणा-या निवड समितीचा शेरा / शिफारस.**

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## ' पर्यावरण पुरस्कार - २०१६ '

## नामांकनासाठी अर्जाचा नमुना
## ( गट - ब )

( अर्जदारास विहीत प्रपत्रातच अर्ज करावयाचा असून तो A-४ साईज पेपरवर संगणकीकृत करावा.)

१) अर्जदाराचे नांव, पुर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक :- ------------------------------------------

------------------------------------------------------------------------

२) लागवड करण्यात आलेल्या झाडांची माहिती व संख्या-(विस्तृत माहिती स्वतंत्र प्रपत्रात द्यावी.)

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

३) शासकीय / सामुहिक अथवा खाजगी जमिनीवर सरपन/वैरण देणा-या झाडांची लागवड :- ---

------------------------------------------------------------------------

| ज्या जमिनीवर लागवड केलेली आहे तिची मालकी- | क्षेत्रफळ (हे.) | जागेचे वर्णन (पडीक/खार जमिन/दलदल इ.) |
|---|---|---|
| खाजगी जमिन | | |
| सामुहिक जमिन | | |
| महसुल जमिन | | |

४) वृक्षलागवडीचे कार्यक्रमात ग्रामीण दुर्बल घटकांचा तसेच महिलांचा सहभाग व त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये झालेली सुधारणा :- ------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

५) वृक्ष लागवडीचे श्रमदानातून केलेले कार्य :- ------------------------------------------

------------------------------------------------------------------------

६) सामुहिक लागवडीचे कुंपणाविना स्वयंस्फुर्तीने संरक्षण व देखभालीकरिता प्रोत्साहीत केलेल्या कार्याची माहिती :- ------------------------------------------

------------------------------------------------------------------------

७) अपारंपारिक ऊर्जा स्त्रोताचा वापर करण्यासाठी जनतेला प्रोत्साहीत करणे व त्याच्या वापरासाठी प्रवृत्त करण्यासाठी केलेल्या कार्याची माहिती सहपत्रासह :- --------------------

------------------------------------------------------------------------

८) वृक्षलागवड, वृक्षसंवर्धन, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन व जैवविविधता संवर्धन, अपारंपारिक उर्जा स्त्रोताचा वापर या संबंधात प्रत्यक्ष केलेल्या कार्याची व जनजागृती / प्रसिध्दी व प्रेरणा याबाबत केलेल्या कार्याची तपशिलवार माहिती :- ------------------------------------------

------------------------------------------------------------------------

९) केलेल्या कार्याचा कालावधी, लागवड केलेल्या जीवंत झाडांची टक्केवारी सद्यस्थिती :- ------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

..२..

| तपशील | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१५ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| लागवडीचे क्षेत्र ( हेक्टरमध्ये ) | | | | | | |
| लागवड केलेल्या झाडांची संख्या | | | | | | |
| जीवंत झाडांची संख्या | | | | | | |
| जलव्यवस्थापन/जलसंवर्धन | | | | | | |

१०) केलेल्या कार्याविषयी काही 'व्याख्याने/प्रकाशने/प्रसिध्दी' झाली असल्यास त्याच्या सत्यप्रती:- ------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

११) या अथवा अशा कामासाठी पुर्वी काही पारितोषिक, पुरस्कार, प्रशस्तीपत्र मिळाले असल्यास त्यांचा तपशील :-

------------------------------------------------

१२) इतर माहिती असल्यास :- ------------------------------------------------

**(अर्जदाराची स्वाक्षरी)**

**<u>प्रतिज्ञापत्र</u>**

प्रतिज्ञापूर्वक सही करतो की, वर नमुद केलेल्या सर्व बाबी माझ्या ज्ञान व माहितीनुसार सत्य आहेत आणि माझ्या स्पष्ट जाणीवेनुसार दिलेल्या आहेत. प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या माहितीचे मुळ दस्ताऐवज तसेच प्रत्यक्ष कार्यक्षेत्राची पाहणी करण्यासंबंधी निवड समितीने मागणी केल्यास त्वरीत उपलब्ध करून देण्याची हमी देतो.

ठिकाण :-

दिनांक :-

**( अर्जदाराचे नांव, स्वाक्षरी व पत्ता)**

------------------------------------------------

**(केवळ कार्यालयाकरिता)**

१) **प्रस्ताव अग्रेषित करणा-या निवड समितीचा शेरा / शिफारस.**